# कमला कॉलेजमध्ये फूड प्रोसेसिंग कोर्स

कोल्हापूर : कमला कॉलेजमध्ये बॅचलर ऑफ व्होकेशनल अंतर्गत रिटेल मॅनेजमेंट अँड आयटी तसेच फूड प्रोसेसिंग अँड मॅनेजमेंट पदवी अभ्यासक्रम (कोर्स) यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून सुरु झाले आहे, अशी माहिती प्राचार्य क्रांतिकुमार पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ते म्हणाले, विद्यापीठातील महाविद्यालयांमध्ये बॅचलर ऑफ व्होकेशन (बी.व्होक.) हा ३ वर्षांचा पदवी व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु करण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे. यासाठी देशातून ३३८ संस्थांनी आपले प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाकडे सादर केले होते. त्यापैकी ९२ महाविद्यालयांना हा अभ्यासक्रम सुरु करण्याची मान्यता मिळाली. (प्रतिनिधी)

१०|६|१४ लोकमत